# गडहिंग्लजला रवळनाथ, ज्ञानदीपतर्फे स्वच्छता

प्रतिनिधी
गडहिंग्लज

येथील रवळनाथ को–ऑप हौसिंग फायनान्स सोसायटी आणि ज्ञानदीप प्रबोधिनी संचलित झेप ॲकॅडमी च्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी जयंती निमित्याने गडहिंग्लज बस स्थानक परिसरात स्वच्छता मोहिम राबवण्यात आले.

सुरुवातीस डॉक्टर कॉलनी येथील प्रधान कार्यालयात महात्मा गांधीच्या प्रतिमेचे पूजन संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ज्ञानदीप प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष डॉ. दत्ता पाटील, संचालिका मीना रिंगणे यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी सागर माने, शिवानंद घुगरे, संदीप कागवाडे, महेश मजती,



**गडहिंग्लज : बसस्थानक परिसरात स्वच्छता मोहिमेत सहभागी झालेले रवळनाथचे संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले, आगाराचे विजयसिंह शिंदे, संदीप कागवाडे आदी.**

चंद्रकांत पत्की, बाबासो मार्तंड, एकनाथ केसरकर, विजय बुगडे, सुनिलदत्त जाधव, अशोक सुळकुडे, उत्तम दळवी, किरण कोडोलीसह अन्य उपस्थित होते. रवळनाथ व ज्ञानदीप प्रबोधिनी कडून सामाजिक बांधिलकी जपत गडहिंग्लज बसस्थानक परिसर, दत्त मंदिर परिसरातील स्वच्छता मोहिम राबवण्यात आले. यावेळी आगाराचे कार्यशाळा अधिक्षक विजयसिंह शिंदे, सुधाकर व्यवहारे, विजय निमकर, वासुदेव जोशी यांच्यासह रवळनाथ, ज्ञानदीपच्या सदस्यांनी सहभाग घेतला होता.

तरुण भारत Mon, 05 October 2020
https://epaper.tarunbharat.com/c/55542592

सकाळ



गडहिंग्लज : बसस्थानक व आगार परिसरात स्वच्छता मोहीमप्रसंगी सहभागी एम. एल. चौगुले, विजयसिंह शिंदे आदी.

# 'ज्ञानदीप'तर्फे स्वच्छता मोहीम

गडहिंग्लज, ता. २ : येथील ज्ञानदीप प्रबोधिनीच्या झेप ॲकॅडमीतर्फे महात्मा गांधी जयंतीनिमित्त एसटी स्थानक आणि आगाराच्या आवारात स्वच्छता मोहीम राबवली. रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटीच्या येथील प्रधान कार्यालयात संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांच्या हस्ते प्रतिमा पूजन झाले.

कार्याध्यक्ष डॉ. दत्ता पाटील, संचालिका मीना रिंगणे यांची भाषणे झाली. प्रशासन अधिकारी सागर माने यांनी स्वागत केले. व्यवस्थापक शिवानंद घुगरे यांनी आभार मानले. यावेळी प्रबोधिनीचे सचिव संदीप कागवाडे, खजिनदार महेश मजती, शाखा सल्लागार चंद्रकांत पत्की, जनसंपर्क अधिकारी बाबासाहेब मार्तंड, मुख्य लेखापाल एकनाथ केसरकर, विजय बुगडे, सीमा साठे, श्वेता टोणण्णावर उपस्थित होते.

प्रबोधिनीने सामाजिक बांधिलकीतून स्वच्छ भारत, सुंदर भारत या संकल्पनेतून बसस्थानक, दत्त मंदिर व आगारात स्वच्छता मोहीम राबविली. या मोहिमेत संस्थापक चौगुले यांच्यासह ज्ञानदीप व रवळनाथ संस्थेचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी आणि आगाराचे कार्यशाळा अधीक्षक विजयसिंह शिंदे, सहा. वाहतूक निरीक्षक सुधाकर व्यवहारे, विजय निमकरआदी सहभागी झाले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
03/10/2020 Page No. 4